**प्रेसनोट** दिनांक:- १०/०६/२०२१

# '' सोनसाखळी खेचणारा अट्टल गुन्हेगार नवी मुंबई गुन्हे शाखेकडुन जेरबंद''
# ( एकुण १४ गुन्ह्यांची उकल )

नवी मुंबई तसेच ठाणे पोलीस आयुक्तालयामध्ये महीलांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने जबरीने चोरी झाल्याबाबत तक्रारी पोलीस ठाण्यांमध्ये प्राप्त झाल्या होत्या. सोनसाखळी चोरीच्या गुन्हयातील फिर्यादी यांची चोरी झालेल्या दागिण्याबाबत भावनिकता जडलेली असते. त्या अनुषंगाने मा. पोलीस आयुक्त, श्री. बिपिनकुमार सिंह सो, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री. डॉ. बी. जी. शेखर पाटील सो, मा. पोलीस उप आयुक्त ( गुन्हे ), श्री. प्रविण पाटील सो, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त ( गुन्हे ), श्री. विनोद चव्हाण सो, यांनी वेळोवेळी मिटींग घेवून सोनसाखळी चोरीच्या गुन्ह्यावर लक्ष केंदीत करून त्यांचेविरुध्द् कडक कारवाई करण्याकामी गुन्हे शाखेच्या सर्व शाखांना सूचना दिल्या होत्या व विशेष पथके तयार करण्यात आली होती.

सदर गुन्हयांच्या समांतर तपासादरम्यान गुन्हे शाखा, कक्ष ०२, पनवेल यांनी नवी मुंबई पोलीस आयुक्तालयात घडलेल्या सोनसाखळी चोरीचा तपशिल संकलीत केला. त्यानुसार चोरी करताना वापरलेल्या वाहनाचा प्रकार, सीसीटिव्ही फुटेज, चोरीचे ठिकाण, चोरीची वेळ व वार, आरोपीचे वर्णन यांचे वर्गीकरण करून अभ्यासपूर्ण व कौशल्यपूर्ण तांत्रिक तपास करून सोनसाखळी चोरी करणारा आरोपी गुन्हे अभिलेख तपासुन निष्पन्न केला. सदर आरोपीचा शोध घेणेकामी गुन्हे शाखा, कक्ष ०२ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गिरीधर गोरे यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि गणेश कराड, सपोनि प्रविण फडतरे, पोउपनि वैभव रोंगे, पोउपनि मानसिंग पाटील यांची वेगवगळी पथके तयार करून सदर पथकांनी मुंब्रा, भिवंडी, कल्याण, वर्तकनगर, व ठाणे रेल्वे परिसरामध्ये सलग ४ दिवस सापळा लावुन ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या अभिलेखावरील अट्टल गुन्हेगार फजल आयुब कुरेशी वय २५ वर्षे, रा. पठाण चाळ, रूम ४, सुचक नाका, कल्याण, जि ठाणे यास ताब्यात घेवुन सखोल चौकशी केली असता तो सोनसाखळी चोरी करण्याकरीता वापरत असलेल्या ०२ मोटार सायकली हस्तगत करून त्याचे कडून एकुण ५ लाख रूपये किंमतीचा मुद्देमालसह नवी मुंबई व ठाणे पोलीस आयुक्तालयातील १२ सोनसाखळी चोरीच्या गुन्ह्यासह एकुण १४ गुन्हे उघडकीस आलेले आहेत.

अटक आरोपीकडे केलेल्या तपासावरुन अदयापर्यंत खालील नमूद गुन्हे उघडकीस आलेले आहेत.

| अ. क्र. | पोलीस ठाणे | गुन्हा रजि. क्रमांक |
|---|---|---|
| १ | पनवेल शहर पोलीस स्टेशन | गुर नं. क्र २६१/२०२१, भादवि कलम ३९२. |
| २ | पनवेल शहर पोलीस स्टेशन | गुर नं. २८५/२०२१, भादवि कलम ३९२ |
| ३ | पनवेल शहर पोलीस स्टेशन | गुर नं. ३०२/२०२१, भादवि कलम ३९२ |
| ४ | कळंबोली पोलीस स्टेशन | गुर नं. १९४/२०२१, भादवि कलम ३९४ |
| ५ | खारघर पोलीस स्टेशन | गुर नं. १८९/२०२१, भादवि कलम ३९२ |
| ६ | खारघर पोलीस स्टेशन | गुर नं. १९८/२०२१, भादवि कलम ३९२ |
| ७ | एपीएमसी पोलीस स्टेशन | गुर नं. १८६/२०२१, भादवि कलम ३९२ |

| | | |
|---|---|---|
| ८ | बाजारपेठ पोलीस स्टेशन, ठाणे | गुर नं. २२२/२०२१, भादवि कलम ३९८ |
| ९ | नारपोली पोलीस स्टेशन, ठाणे | गुर नं. २११/२०२१, भादवि कलम ३९२ |
| १० | कोनगांव पोलीस स्टेशन, ठाणे | गुर नं. १४६/२०२१, भादवि कलम ३९२ |
| ११ | मानपाडा पोलीस स्टेशन, ठाणे | गुर नं. २२५/२०२१, भादवि कलम ३७९ |
| १२ | मानपाडा पोलीस स्टेशन, ठाणे | गुर नं. २३६/२०२१, भादवि कलम ३९२ |
| १३ | मानपाडा पोलीस स्टेशन, ठाणे | गुर नं. ३०९/२०२१, भादवि कलम ३७९ |
| १४ | भिवंडी तालुका पोलीस स्टेशन, ठाणे | गुर नं. ११७/२०२१, भादवि कलम ३९२ |

नमूद आरोपी गुन्हा करण्यासाठी वापरत असलेल्या एकुण ०२ मोटार सायकली देखिल जप्त करण्यात आलेल्या आहेत. सदर नमुद आरोपी हा अट्टल गुन्हेगार असुन त्याचेवर यापुर्वी चोरी, जबरी चोरी, अवैधरित्या शस्त्रे बाळगणे, व प्राणी संरक्षण अधिनियम इत्यादी असे मुंबई शहर, नवी मुंबई व ठाणे परिसरामध्ये एकुण २२ गुन्हे दाखल आहेत.

सध्या कोरोना विषाणुचा सर्वत्र प्रादुर्भाव होत असल्याने त्या आधारावर सदर आरोपीस मा. न्यायालयाने दि. २४/०४/२०२१ रोजी जामिनावर मुक्त केले होते. त्यानंतर आधारवाडी कारागृह, जि ठाणे येथुन बाहेर आल्यानंतर सदर आरोपीने वरीलप्रमाणे गुन्हे केलेले आहेत.

सदरच्या गुन्हयाच्या तपासादरम्यान सफौ एस. पाटील, सफौ एस. सांळुके, पोहवा १७३२/पाटील, पोहवा १३३९/काटकर, पोहवा १३४३/ गडगे, पोहवा ४२०/पवार, पोहवा २७००/कुदळे, पोना २०२२/पाटील, पोना २०८२/कानु, पोना २३३४/मोरे, पोना ४४१३/फुंडे, पोशि १२५९३/पाटील, पोशि ३६२५/ मेरे, पोशि ३६३६/गडकरी, यांनी उल्लेखनीय कामगिरी केलेली आहे. नमूद अटक आरोपीतांकडून नवी मुंबई परिसरातील आणखी काही उघड होण्याची शक्यता आहे.

-----